माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.६८० /२४ /त.क्र.१३९ /२५/०१

श्री. शरद भाऊराव बांडे
बी/४०, राष्ट्रसारथी को-ऑप.हौ.सो.लि., दिनदयाळ नगर,
मुलुंड (पुर्व), मुंबई – ४०००८१.

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अधिकारी (चौकशी)
खात्याअंतर्गत चौकशी विभाग यांचे कार्यालय,कक्ष क्र. १०,
३ रा मजला, जी/उत्तर विभाग, कार्यालय इमारत,
दादर (प.), मुंबई-४०००२८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख अधिकारी (चौकशी)
प्रमुख अधिकारी चौकशी यांचे कार्यालय, ४ था मजला,
नविन विस्तारीत इमारत, मनपा मुख्यालय,महानगरपालिका मार्ग,
फोर्ट, मुंबई-४००००१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी दिनांक २ जानेवारी, २०२४ रोजी पारित केलेल्या अपील क्रमांक १५२०/२३ आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत तक्रार अर्ज कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या संदर्भात वरील आदेशाचे अनुपालन दिनांक ०४/०६/२०२४ रोजी झाले असून तक्रारदार श्री.शरद बांडे यांच्या द्वितीय अपील अर्जावर पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने विभागीय चौकशी प्रकरणातील दोन संचांमधील अनुक्रमे पृष्ठ १ ते १० व १ ते ३६ इतकी माहिती प्रदान करण्यात आली असून तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार ही बाब आदेशाचे उल्लंघन करणारी आहे.

याउलट प्राधिकरणाच्या वतीने द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणी दरम्यान आदेशित केलेल्या सर्व पृष्ठांची माहिती तक्रारदार यांना देण्यात आली असून या प्रकरणात नस्तीतील इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रत देण्यास देखील त्यांचा कुठलाही आक्षेप नाही. जर तक्रारदार यांची इच्छा असल्यास उर्वरित कागदपत्रांची छायांकित प्रत देखील त्यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात येईल.

उपरोक्त अनुपालन अहवालावरून पारित केलेल्या आदेशाचे उल्लंघन झाले नसल्याचे प्रथम दर्शनी आढळून येते. तथापि, उपरोक्त नस्तीतील जर प्रदान केलेल्या माहिती व्यतिरिक्त माहिती उपलब्ध असल्यास

त्याची एक छायांकित प्रत तक्रारदारांना तात्काळ प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१२.२०२५**